# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **बैठक क्रमांक** | : | 61 |
| **स्थळ** | : | प्रशासकीय इमारत सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422222 |
| **दिनांक** | : | सोमवार, दि. 19 जून 2023 |
| **वेळ** | : | दुपारी 12.00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## (महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषद 61 वी बैठक सोमवार, दि. 19 जून 2023 रोजी दुपारी 12.00 वा. प्रशासकीय इमारत सभागृहात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01. | प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरु | अध्यक्ष |
| 02. | डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा व प्रभारी संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 03. | डॉ. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग | सदस्य |
| 04. | डॉ. प्रविण घोडेस्वार , प्रभारी संचालक, मानव्यविद्या व सा.शास्त्रे विद्याशाखा | सदस्य |
| 05. | डॉ. सुरेंद्र पाटोळे, प्रभारी संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 06. | डॉ. माधुरी सोनवणे, प्रभारी संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 07. | डॉ. चेतना कामळस्कर, प्रभारी संचालक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 08. | डॉ.कविता साळुंके, प्रभारी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 09. | श्री. माधव पळशीकर, प्रभारी संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 10. | डॉ.प्रकाश देशमुख, प्रभारी संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | सदस्य |
| 11. | डॉ. सज्जन थुल, प्रभारी संचालक , मूल्यमापन विभाग | सदस्य |
| 12. | डॉ. मधुकर शेवाळे, उपग्रंथपाल, ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र | सदस्य |
| 13. | डॉ. संजीवनी महाले, प्राध्यापक | सदस्या |
| 14. | डॉ. दयाराम पवार,सहायक प्राध्यापक | सदस्य |
| 15. | श्री. राजेंद्र वाघ, सहयोगी प्राध्यापक | सदस्य |
| 16. | श्री. भटूप्रसाद पाटील, कुलसचिव, व परीक्षा नियंत्रक | सदस्य सचिव |
| 17. | डॉ. राम ठाकर, संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष | निमंत्रित |

| क्र. | ठराव क्र. | तपशिल |
|---|---|---|
| 61.1.0 | | **स्वागत** – नवनिर्वाचित कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचे सर्वांनी स्वागत केले तसेच मा.कुलसचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले. |
| 61..2.0 | 61.2.1 | **दि. 23 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 60 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे**<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या ६० व्या विद्वत परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |
| | 61..2.2 | **दि. 23 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 60 व्या विद्वत परिषदेच्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचाअहवाल**<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी झालेल्या ६० व्या विद्वत परिषदेच्या बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 61.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 61.3.1<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन कक्ष | **आर्किटेक्चर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे नाव विज्ञान विद्याशाखा (स्कूल ऑफ सायन्सेस) असे नाव बदलास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव...**<br>**टिपणी** – शिक्षणक्रम मान्यते संदर्भात दिनांक 24.5.2023 रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाबरोबर झालेल्या ऑनलाईन बैठकीत त्यांनी काही मुद्दे निदर्शनास आणून दिले त्यापैकी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेनुसार, विद्यापीठातील आर्किटेक्चर, विज्ञान व तंत्रज्ञान या विद्याशाखेचे नाव विज्ञान विद्याशाखा (स्कूल ऑफ सायन्सेस) नाव बदल करणे आवश्यक असल्याचे अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राच्या दि. 25.5.2023 च्या अंतर्गत संज्ञापन पत्रान्वये मा. कुलगुरू यांना कळविले आहे. मा. कुलगुरू यांनी सदर विद्याशाखेचे नाव बदलास मान्यता दिलेली आहे. तरी आर्किटेक्चर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे नाव विज्ञान विद्याशाखा (स्कूल ऑफ सायन्सेस) असे बदलण्याचा प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीस्तव विद्वत परिषदेसमोर सादर....<br>**विद्वत परिषद ठराव** - आर्किटेक्चर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे नाव विज्ञान विद्याशाखा (स्कूल ऑफ सायन्सेस) असे नाव बदलास कार्योत्तर मान्यतेचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. |
| | 61.3.2<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **दि. 14 मे 2022 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 55 चे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दि. 14 मे 2023 रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 14 मे 2022 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 55 चे इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.3.3<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा | **दि. 12 जून 2023 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 57 चे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दि. 12 जून 2023 रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 12 जून 2023 रोजी आयोजित शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद क्र. 57 चे इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.3.4<br>विद्यापीठ संशोधन समिती | **मुक्त विद्यापीठाच्या 2008 पर्यंत प्रवेशित झालेल्या Ph.D. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना Course Work मधून मुक्त (सूट) करून समकक्षता प्रमाणपत्र देणेबाबत....**<br>**टिपणी** - श्रीमती शोभा आबासाहेब मधाळे यांचा Ph.D. प्रवेश दि. 01.07.2008 रोजी झालेला होता व त्यांची 2017 मध्ये Ph.D. पदवी प्रदान करण्यात आली होती. युजीसी च्या 2009 च्या Rules & Regulations नुसार Ph.D. मध्ये Course Work चा समावेश करण्यात आला आहे. त्यांचा प्रवेश 2009 च्या पूर्वीचा असल्याने त्यांना Course Work नव्हता त्यामुळे त्यांनी Course Work मधून मुक्त करून समकक्षता प्रमाणपत्र मिळावे, |

| | | |
|---|---|---|
| | | मुक्त विद्यापीठाच्या 2008 पर्यंत प्रवेशित झालेल्या Ph.D. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना समकक्षता प्रमाणपत्र देण्याचा अधिकार कुलसचिव/परीक्षा नियंत्रक यापैकी कोणाला असावा याबाबत मार्गदर्शन करण्याबाबतचा विषय विद्वत परिषदेसमोर सादर.<br>**विद्वत परिषद ठराव** - मुक्त विद्यापीठाच्या 2008 पर्यंत प्रवेशित झालेल्या Ph.D. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना Course Work मधून सूट देऊ नये असे सर्वानुमते ठरले. तसेच UGC, Ph.D. regulation नुसार Course Work मध्ये सूट मिळण्यासाठी आवश्यक अहर्ता/अटी काय असाव्यात याबाबत समन्वयक विद्यापीठ संशोधन समिती यांनी मा. कुलगुरू यांना प्रस्ताव सादर करावा असे ठरले. |
| | 61.3.5<br>विद्यापीठ संशोधन समिती | **पीएच.डी. 2019 प्रवेश प्रक्रिया, प्रवेश शुल्क आणि प्रतिवर्षी शुल्क आणि संशोधन अहवाल मूल्यमापन शुल्कास कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** – सन 2019 या वर्षी शिक्षणशास्त्र विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि विज्ञान विद्याशाखा या तीन विद्याशाखांमध्ये पीएच.डी. विद्यार्थी प्रवेशित आहेत. विद्यार्थ्यांकडून प्रथम वर्षी रु. 25,000/- शुल्क घेण्यात आलेले होते आणि शैक्षणिक वर्ष 2021-22 पासून प्रतिवर्षी शुल्क रु. 20,000/-, मुदतवाढ शुल्क रु. 20,000/- आणि संशोधन अहवाल मूल्यमापन शुल्क रु. 18,000/- घेण्याकरिताचा विषय विद्वत परिषदेत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर....<br>**विद्वत परिषद ठराव** - विद्यार्थ्यांकडून 2019 प्रथम वर्षी रु. 25,000/- शुल्क घेण्यात आलेले होते आणि शैक्षणिक वर्ष 2021-22 पासून प्रतिवर्षी शुल्क रु. 20,000/-, मुदतवाढ शुल्क रु. 20,000/- आणि संशोधन अहवाल मूल्यमापन शुल्क रु. 18,000/- घेण्यास विद्वत परिषदेत कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 61.3.6 | **दि. 10 जून 2023 रोजी झालेल्या नियोजन मंडळ बैठकीतील ठराव क्र. 44.3.7, 44.3.8, 44.3.9, 44.3.10, 44.3.11, 44.4.1 विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**विद्वत परिषद ठराव** –१. दि. 10 जून 2023 रोजी झालेल्या नियोजन मंडळ बैठकीतील ठराव क्र. 44.3.7, 44.3.8, 44.3.10, 44.3.11, 44.4.1 ला मान्यता देण्यात आली.<br>2. ठराव क्र. 44.3.9 - विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार 385 कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासकेंद्र बंद करण्यात आली आहेत अशा कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यापीठाचे फॅसिलिटी सेंटर म्हणून देण्याबाबत एक अभ्यास समितीची स्थापना करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली याबाबत संचालक, विद्यार्थी सेवा विभाग यांनी कार्यवाही करावी. |
| | 61.3.7<br>विज्ञान विद्याशाखा | **दि. 31 मार्च 2023 व 13 जून 2023 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 31 मार्च 2023 व 13 जून 2023 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर<br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 31 मार्च 2023 व 13 जून 2023 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 61.3.8<br>संगणकशास्त्र विद्याशाखा | **दि. 13 जून 2023 रोजी संगणकशास्त्र विद्याशाखा आयोजित संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दि. 13 जून 2023 रोजी संगणकशास्त्र विद्याशाखा आयोजित संगणकशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br><br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 13 जून 2023 रोजी संगणकशास्त्र विद्याशाखा आयोजित संगणकशास्त्र विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. मात्र संगणकशास्त्र विद्याशाखेच्या Certificate in Computerised Accounting आणि Diploma in Computerised Accounting या दोन शिक्षणक्रमांच्या प्रवेश शुल्कातील LSC चा हिस्सा रु. 3800/- ऐवजी रु. 3000/- व YCMOU चा हिस्सा रु. 200/- ऐवजी रु. 1000/- इतके करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.3.9<br>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | **दि. 14 जून 2023 रोजी वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा आयोजित वाणिज्य व व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दि. 14 जून 2023 रोजी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आयोजित वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br><br>**विद्वत परिषद ठराव** - दि. 14 जून 2023 रोजी वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा आयोजित वाणिज्य व व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्ताची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. |
| | 61.3.10<br>कृषी विज्ञान विद्याशाखा | **दिनांक 14 जून 2023 रोजी कृषी विज्ञान विद्याशाखा आयोजित कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दिनांक 14 जून 2023 रोजी कृषी विज्ञान विद्याशाखा आयोजित कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** - दिनांक 14 जून 2023 रोजी कृषी विज्ञान विद्याशाखा आयोजित कृषी विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.3.11<br>मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा | **दिनांक 15 जून 2023 रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा आयोजित मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** -- दिनांक 15 जून 2023 रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा आयोजित मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** - दिनांक 15 जून 2023 रोजी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा आयोजित मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 61.4.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळेचा विषय** |
| | 61.4.1 | **दि. 10 जून 2023 रोजी आरोग्य विद्याशाखा आणि निरंतर विज्ञान विद्याशाखा आयोजित आरोग्य विद्याशाखा आणि निरंतर विज्ञान विद्याशाखा विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – दिनांक 10 जून 2023 रोजी आरोग्य विद्याशाखा आणि निरंतर विज्ञान विद्याशाखा आयोजित आरोग्य विद्याशाखा आणि निरंतर विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** - दिनांक 10 जून 2023 रोजी आरोग्य विद्याशाखा आणि निरंतर विज्ञान विद्याशाखा आयोजित आरोग्य विद्याशाखा आणि निरंतर विज्ञान विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्ताची नोंद घेऊन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.4.2 | **विद्यापीठात School of Online Learning ची स्थापना करण्यास मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** – विद्यापीठ आयोगाने मुक्त विद्यापीठांना ODL आणि Online Regulation 2020 लागू केले आहे. त्यामुळे आपल्या विद्यापीठालाही विद्यार्थांना ऑनलाईन पदवी, पदव्युत्तर पदवी, डिप्लोमा व प्रमाणपत्र शिक्षणक्रम उपलब्ध करून देण्याची संधी प्राप्त झाली आहे. ऑनलाईन लर्निंग इतर पारंपारिक शिक्षण प्रणाली पेक्षा वेगळी असल्याने आणि त्यात मोठ्याप्रमाणात विद्यार्थ्यांना सामावून घेण्याची शक्ती असल्याने विद्यापीठात एका स्वतंत्र विद्याशाखेची आवश्यकता आहे जेणेकरून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अनेक रोजगारभिमुख ऑनलाईन शिक्षणक्रम उपलब्ध करणे शक्य होईल. भविष्यातील गरज लक्षात घेता विद्यापीठात सकूल ऑफ ऑनलाईन लर्निंग असावे. असे वाटते. त्यामुळे सदर विद्याशाखा स्थापन करण्यासाठी प्रस्ताव चर्चेसाठी आणि मान्यतेसाठी सादर तसेच School of Online Learning ची स्थापना करण्यात यावी व त्यात खालीलप्रमाणे मनुष्यबळ असावे.<br>1. प्राध्यापक – 01<br>2. सहायक प्राध्यापक – 03<br>3. संगणक ऑपरेटर – 04<br>4. सहायक/वरिष्ठ सहायक – 01<br>सदरचा विषय विद्वत परिषदेच्या निर्णयार्थ सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** - विद्यापीठात School of Online Learning ची स्थापना करण्यास व सदर पदे भरतांना विषय तज्ञ (Specialisation) विचार न करता मनुष्यबळ घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.4.3 | मालेगाव व भिवंडी येथील पावरलूम वर्करसाठी Skill Appreciation / Prior Skill Recognisation पुन्हा सुरू करणेबाबत ...<br>**विद्वत परिषद ठराव** - मालेगाव व भिवंडी येथील पावरलूम वर्करसाठी Skill Appreciation / Prior Skill Recognisation पुन्हा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 61.4.4 | **बी.ए.(मूल्यशिक्षण), बी.ए. (पोलीस प्रशासन), बी.ए.(आर्मी) या शिक्षणक्रमांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने आयोजित करणेबाबत...**<br>टिपणी - बी.ए.(मूल्यशिक्षण), बी.ए. (पोलीस प्रशासन), बी.ए.(आर्मी) या शिक्षणक्रमांची परीक्षा दरवर्षी ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात येते. वर्ष २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील अंतिम परीक्षा दि. ३ ते १३ जुलै २०२३ या कालावधीत आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. सदर ऑनलाईन परीक्षा सन २०२०-२१ च्या वेळेस नियुक्त केलेल्या We Shine Tech या एजन्सीकडून प्रती पेपर रु. १४.३४ दराने करणे प्रस्तावित आहे. या परीक्षेचा एकूण आयोजन खर्च रु. ४३,२७८/- इतका अपेक्षित आहे.<br>**विद्वत परिषद ठराव** - बी.ए.(मूल्यशिक्षण), बी.ए. (पोलीस प्रशासन), बी.ए.(आर्मी) या शिक्षणक्रमांची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करावी असे सर्वानुमते ठरले. |
| | 61.4.5 | विद्यापीठाच्या एम.बी.ए. शिक्षणक्रमास AICTE च्या मान्यतेनुसार सन २०२३-२४ ते २०२७-२८ या पाच वर्षाकरिता प्रवेश मर्यादा प्रती वर्षी १०००० प्रवेश मान्यतेबाबत...<br>विषय – विद्यापीठाच्या एम.बी.ए. शिक्षणक्रमास AICTE च्या मान्यतेनुसार सन २०२३-२४ ते २०२७-२८ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता प्रती वर्षी १०००० प्रवेश देण्यास मान्यता मिळालेली आहे. सोबत AICTE च्या मान्यतेचे पत्र जोडले आहे. त्यानुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यास मान्यता मिळाणेकरिता विद्वत परिषदेसमोर सादर...<br>**विद्वत परिषद ठराव** - एम.बी.ए. शिक्षणक्रमास AICTE च्या मान्यतेनुसार सन २०२३-२४ ते २०२७-२८ या पाच वर्षाकरिता प्रवेश मर्यादा प्रती वर्षी १०००० प्रवेश प्रक्रिया विहीत पद्धतीने राबविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 61.4.6 | **विद्याशाखा/केंद्र/विभाग सुरू करण्यासाठी मा. कुलगुरू यांना सर्व अधिकार प्रदान करणेबाबत...**<br>**टिपणी** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण आणि भविष्यात मुक्त विद्यापीठाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. विद्यापीठास विद्यार्थी संख्या वाढीसाठी अनेक आमूलाग्र बदल करावी लागतील आणि त्यासाठी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील. धोरणात्मक निर्णय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी काही नवीन विद्याशाखा/ केंद्र किंवा विभाग स्थापन करावे लागतील. आवश्यकतेनुसार विद्याशाखा/केंद्र किंवा विभाग स्थापन करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना दिल्यास निर्णय घेतांना विलंब होणार नाही अशी धारणा आहे. तेव्हा विद्यापीठाच्या गरजेनुसार नवीन विद्याशाखा, केंद्र व विभाग स्थापन करण्याबाबत सर्व अधिकार मा. कुलगुरू यांना देण्याबाबत प्रस्ताव विद्वत परिषदेसमोर चर्चा व मान्यतेसाठी सादर..<br>**विद्वत परिषद ठराव** - विद्यापीठाच्या गरजेनुसार नवीन विद्याशाखा, केंद्र व विभाग स्थापन करण्याबाबत सर्व अधिकार मा. कुलगुरू यांना देण्याबाबत विद्वत परिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर |

**सचिव**
**विद्वत परिषद**

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**